

ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉमप्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२५२३३०

रजि. नं.ः एनएसके /सीएचडी/आरएसआर/सीआर/८४० दि. २९/०५/२००१

सुरक्षितता, विश्वासार्हता, आणि तत्परता यांचा त्रिवेणी सुरेख संगम

## ❖ संचालक मंडळ ❖

**संस्थापक ः- श्री. प्रा. निकम टी. पी.**

| | |
|---|---|
| श्री. तुकाराम पुंडलिकराव निकम | चेअरमन |
| श्री. गोपीनाथ मुरलिधर खैरे | व्हा. चेअरमन |
| श्री. डॉ. अरूण पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री. देविदास त्रंबकराव शेलार | संचालक |
| श्री. सुरेश पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री. दत्तात्रेय काशिनाथ गांगुर्डे | संचालक |
| श्री. किशोर दशरथ शेलार | संचालक |
| श्री. प्रभाकर रूंझा बिडगर | संचालक |
| श्री. रामदास सदाशिव साळवे | संचालक |
| सौ. कल्पना संजय गांगुर्डे | संचालिक |
| सौ. साधना भाऊसाहेब शेलार | संचालिक |
| श्री. नंदकुमार पुंडलिकराव शेलार | जनसंपर्क अधिकारी |
| श्री. केढु फकिरा गांगुर्डे | स्विकृत संचालक |

## कर्मचारी वृंद

| | |
|---|---|
| श्री. दिपक जगन्नाथ निकम | मॅनेजर |
| श्री. सतिश मुरलीधर आहेर | वसुली अधिकारी |
| श्री. गजेंद्र बाळू शेलार | लिपीक |
| श्री. राजेश सुभाष व्यवहारे | कॅशियर |
| श्री. सुशिल दिगंबर पंडीत | शिपाई |

**कायदेशीर सल्लागार**

ॲड. श्री. शिवाजीराव महादु सोनवणे

**वाहन व्हॅल्युअर**

श्री. अभयकुमार आर. मेहता, मालेगाव



ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता.चांदवड जि.नाशिक फोन नं.:-२५२३३०

रजि.नं.: एनएसके /सीएचडी/आरएसआर/सीआर/८४० दि.२९/०५/२००१

१७ वी

## ❖वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ❖

**फक्त सभासदांसाठीच**

**जा.क.वा.स.सन.२०१८** **दि.०५/०८/२०१८**

आपल्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची **"वार्षिक सर्व साधारण सभा" रविवार दि.१९/०८/२०१८ रोजी सकाळी ११.००वा. चंद्रभागा लॉन्स गणुर रोड चांदवड.** येथे आपल्या संस्थेचे **चेअरमन मा.प्रा.श्री.निकम टी.पी.** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी बोलविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती!

### सभेपुढील विषय

१) मा.नियोजीत अध्यक्षांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वृत्त वाचून कायम करणे.
३) दि.३१.०३.२०१८ अखेरची आर्थिक पत्रके,ताळेबंद नफा-तोटा पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल वाचुन कायम करणे.
४) सन २०१७-२०१८ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
५) सन २०१८-२०१९ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६) सन २०१७-२०१८वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाला मान्यता देणे.
७) सन २०१७-२०१८वर्षाचे ऑडीट मेमोचे वाचन करून तो स्विकारणे व दोष दुरूस्ती करून मंजुरी देणे.
८) सन २०१८-१९या वर्षाकरिता लेखापरिक्षकाची नेमणुक करणेबाबत
९) उप समितीच्या अहवालावर चर्चा करणे बाबत.
१०)महात्मा फुले संजीवनी योजनेचे वाचन करणे बाबत.
११)संस्थेच्या कर्मचाऱ्याना सेवा शर्ती व नियमावली लागु करणे बाबत.
१२)सामान्य कर्जाची मर्यादा वाढविण्यासाठी उपविधी दुरूस्ती करून तो मंजुर करणे बाबत.
१३)संस्थेचे कार्यक्षेत्र वाढविण्यासाठी उपविधी दुरूस्ती करणे बाबत.
१४)वार्षिक सर्व साधरण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१५)मा.अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणेबाबत.

**आपले नम्र**

| | | |
|---|---|---|
| **श्री.दिपक निकम** | **श्री गोपिनाथ खैरे** | **श्री.प्रा.निकम टी.पी.** |
| मॅनेजर | व्हा.चेअरमन | चेअरमन |

**मा.संचालक मंडळ**

### सुचना

१) ज्या सभासदांना माहिती हवी असेल अगर काही सुचना करावयाच्या असतील त्यांनी दि.१२/०८/२०१८ पर्यंत लेखी कळवावे.
२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर कोरम असो वा नसो सभेचे कामकाज पुर्ण करण्यात येईल.



ऋणातून समृध्दीकडे

**महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)**

रेणुका कॉमप्लेक्स पहिला मजला चांदवड ता.चांदवड जि.नाशिक फोन नं.ः-२५२३३०

रजि.नं.ः एनएसके /सीएचडी/आरएसआर/सीआर/८४० दि.२९/०५/२००१

# सन २०१७ - २०१८चा वार्षिक अहवाल

सस्नेह नमस्कार ......

सर्व सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो ,

**आज १७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी** आलेल्या सर्व सन्माननीय सभासदांचे महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपुर्वक स्वागत करतो.दि.३१/०३/२०१८ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या प्रगतीचा आलेख मांडण्यासाठी मी आपल्या समोर उभा आहे.नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

चांदवड तालुक्यातील सर्व सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवून मोलाचे सहकार्य केले.ठेवीदारांच्या व सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतलेली आहे. संस्थेला सलग ६ वर्षे "अ तारांकीत" तर ११ वर्ष "अ" ऑडीट वर्ग मिळालेला आहे.हया वर्षात संस्थेने सतरा वर्ष पुर्ण केले आहे.१७वर्षाच्या कालावधीत संस्था स्वयंपुर्ण झालेली असुन आर्थिक दृष्टया मजबुत आहे.स्वतःच्या मालकीच्या अदयावत भव्य नुतन वातानुकूलित वास्तुत संगणकीकरणासह सुसज्ज अवस्थेत आज हि संस्था आपण पाहत आहोत.

सन २००१ रोजी समाजाने लावलेले हे छोटेसे रोपटे आज त्याचे कल्पवृक्षात रूपांतर झाल्याचा चमत्कार आपण पाहात आहोत. चांदवड तालुक्यात अग्रगण्य व शिस्तबध्द, प्रभावी प्रशासन असलेली संस्था म्हणून **महात्मा फुले नागरी सह.पतसंस्थेची** ओळख झालेली आहे. सुरूवातीपासून संस्थेच्या सर्व व्यवहारात नियोजन बध्दता, पारदर्शकता, तत्परता, विश्वासार्ह ता व आर्थिक शिस्ती बरोबर कार्यालयीन शिस्त राखण्याचे काम संचालक

मंडळाने केलेले आहे. ते केवळ आपल्या बहुमोल सहकार्यामुळे शक्य झालेले आहे. संस्थेच्या नेत्रदिपक प्रगतीत आपला मोलाचा वाटा आहे. चांदवड तालुक्यातील अनेक नामांकित पतसंस्था आहे. त्यांच्याशी निर्मळस्पर्धा करून, दुष्काळ, आर्थिक मंदी, व गारपीट, नोटाबदली महाराष्ट्र सहकार खात्यांनी लादलेले निर्बंध या सर्वांना सक्षमपणे सामोरी जावून संस्थेने गरजु व होतकरू तरूणांना, सभासदांना व्यावसायिकांना कर्जवाटप केले आहे. सभासदांनी देखील आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविल्यामुळे आम्ही ९६% कर्जवसुली करू शकलो ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे. म्हणुन सभासदांना मी धन्यवाद देतो व असेच सहकार्य मिळो अशी आपेक्षा करतो.

दरवर्षी वाढता नफा, वाढत्या ठेवी ही संस्थेच्या दृष्टीने भूषणावह गोष्ट आहे. आज **"महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था"** ही अंतर -बाहय सुंदर व आर्थिक दृष्टया सक्षम असलेली तालुक्यातील एकमेव संस्था आहे. या श्रेयाचे मानकरी संचालक मंडळ असले तरी खरे श्रेयाचे मानकरी हे सन्माननीय सभासद आहे. त्यांच्याच सहकार्यामुळे संस्थापक प्रा. निकम टी.पी. यांच्या स्वप्नांना मुर्त स्वरूप आले आहे. संस्थेच्या आजपर्यंतच्या या प्रगतीचे, संस्थेला नावारूपाला आणून उत्तुंग शिखरावर पोहचविण्याचे खरे शिल्पकार संस्थापक प्रा. निकम टी.पी. हे आहे.

संस्थेच्या प्रगतीचे १७वर्षाचे प्रतिबिंब पत्रक आपणास दिले आहे, गेली १७वर्षापासुन आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीचा आलेख वेगाने उंचावत आहे. या वर्षी देखील संस्थेला 'अ' ऑडीट वर्ग मिळालेला असुन वेटेज ॲव्हरेज पध्दतीनुसार १००पैकी ८९ गुण मिळालेले आहे. चांदवड तालुक्यातील कोणत्याही पतसंस्थेला एवढे गुण मिळालेले नाही. ऑडिट मेमोमध्ये आज पर्यंत कोणत्याही प्रकारच्या आर्थिक व्यवहाराबाबत, व्यवस्थापना बाबत गंभीर आरोप किंवा दोष नोंदविलेले नाही हे मी अभिमानाने आपणास सांगु इच्छितो, या सर्व गोष्टिंचा तुम्हाला व आम्हाला रास्त अभिमान वाटवा अशी ही बाब आहे. गुणात्मक दृष्टया आपली पतसंस्था नंबर १ आहे हेच आपल्या पतसंस्थेचे खास वैशिष्टये आहे, असेच आपले सर्वांचे सहकार्य राहील अशी आशा बाळगतो. संस्था याच वेगाने विकासाच्या दिशेने उंच भरारी घेईल अशी मी संचालकांच्या वतीने ग्वाही देतो. पुनःश्च एकदा आपले मनःपुर्वक हार्दिक स्वागत करून आपल्या शुभेच्छा हृदयाशी बाळगून १७वा वार्षिक अहवाल आपणापुढे सविनय सादर करीत आहे.

## भागभांडवल :-

संस्थेचे अधिकृत भागभांडवल ५०लाख रूपये असून दि.३१/०३/२०१८ अखेर संस्थेचे एकुण सभासदाचे वसूल भागभांडवल २२,२४,५५०=०० रूपये आहे.अहवाल सालात भागभांडवलात १,६८,८००=०० रूपयांनी वाढ झालेली आहे.

## राखीव व इतर निधी :-

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व स्थैर्याची कल्पना तिच्या एकूण निधी वरून लक्षात येते.कारण राखीव व इतर निधी हाच संस्थेचा आत्मा आहे. दि.३१/०३/२०१८ अखेर संस्थेचा निधी रूपये ९४,६१,७००.३७ असून अहवाल वर्षात निधीमध्ये रूपये ७,७३,५९७=७२ ने वाढ झालेली आहे.

## ठेवी :-

संस्थेचे पारदर्शी कामकाज व संस्थेवरील दृढ विश्वास यामुळे अनेक हितचिंतक व स्नेही बांधवांनी उत्स्फुर्तपणे ठेवी ठेवल्यामुळे ठेवीमध्ये प्रतिवर्षी प्रंचड वेगाने वाढ होत आहे.ही संस्थेच्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट आहे.ठेवीत होणारी वाढ ही सभासद व परिवाराच्या विश्वासाचे प्रतिक आहे. या वर्षाअखेर संस्थेच्या ठेवी रूपये ६,४१,३१,४३४=९२ इतक्या आहे.सदर ठेवी मधे गत वर्षाच्या तुलनेत ७.९६% ने वाढ झालेली आहे.ही पतसंस्थेच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब आहे.सदर ठेवी अत्यंत सुरक्षीत आहे असे मी चेअरमन या नात्याने आपणांस सांगू इच्छिते.

## कर्ज वाटप :-

संस्थेने व्यापारी, शेतकरी, शेतमजूर,कामगार,मजूर,नोकरवर्ग,उदयोजक इत्यादी सर्व गरजू व होतकरू लोकांना 'अ' वर्ग व 'ब' वर्गातून कर्ज वाटप केलेले आहे.

कर्ज वाटप करतांना त्यांची विश्वासार्हता व कर्ज परत फेडिची क्षमता या गुणात्मक कसोटीच्या आधारे रूपये ४,०२,३३,०९५=२० इतके कर्ज वाटप केलेल आहे.





**थकबाकी :-**

थकबाकी वसूल करणे हे पतसंस्थेच्या कामकाजातील सर्वात कठीण काम आहे.परंतु वसुली हा संस्थांचा आत्मा असून त्यावर संस्थेचे अस्तित्व व विकास अवलंबून असतो. संस्थेचे संस्थापक चेअरमन प्रा. निकम टि.पी.,कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न व सभासदांनी दिलेली मोलाची साथ यामुळे दि.३१/०३/२०१८ अखेर संस्थेने ९६% इतकी कर्जवसुली केली आहे.थकबाकी असलेल्या सभासदांवर कलम ९१ व कलम १३८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.सर्व कर्जदार सभासदांनी नियमित कर्ज भरून संस्थेला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो.एन.पी.ए.ची तरतुद पूर्णपणे केलेली असून संस्थेचे एन.पी.ए.चे प्रमाण ३.७२% इतके आहे.संस्थेचा सी.डि.रेशो ४८% आहे.

**गुंतवणूक :-**

सहकार खात्याने पतसंस्थेला घालून दिलेल्या सी.डी.रेशोचे आपल्या पतसंस्थेने पूर्णपणे यापुर्वी पालन केलेले आहे. संस्थेच्या नियोजन पूर्वक व अत्यंत सुरक्षित पध्दतीने रूपये ३,६६,७९,४५६=00 रूपयांची गुंतवणूक केलेली असुन मागील वर्षाच्या तुलनेने ती ८७% वाढलेली आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झालेल्या असुन संचालकांनी स्वतःची कामे बाजुला ठेवुन संस्थेच्या विकासासाठी कमाल वेळ दिलेला आहे म्हणुन संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. यापुढेही असेच सहकार्य मिळेल अशी मी अपेक्षा बाळगतो .

**नफा:-**

गुणात्मक कर्ज वाटप व कमाल कर्जवसुली, खर्चात काटकसर, कुशल व्यवस्थापन व कौशल्यपूर्ण गुंतवणूक या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे या वर्षात संस्थेला १३,७२,८१२=२० रूपये निव्वळ नफा झालेला आहे. या वर्षी संस्थेने १३,७२,८१२=२० रूपयांच्या नफ्यातुन उपविधीच्या अधिन राहुन नियमाप्रमाणे सर्व प्रकारच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहे.प्रतिवर्षी वाढता नफा संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद गोष्ट आहे .





**कर्मचारी परिवार :-**

आपल्या संस्थेस अतिशय कार्यक्षम,प्रामाणिक व समर्पित भावनेने प्रेरित असे ५कर्मचारी वर्ग लाभलेले आहे .संस्थेच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सस्थेच्या विकासावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून संस्थेतील कर्मचारी परिवाराने ध्येयाने प्रेरित होवून निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करावे कारण आपणांस विकासाचा अजून बराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे.

**लेखा परिक्षण :-**

संस्थेच्या लेखा परिक्षणावरून संस्थेचे खरे चित्र समजते. संस्थेला यापुर्वी ६ वर्ष सतत "अ स्टार" ऑडीट वर्ग मिळालेला आहे .तर ११ वर्ष 'अ' ऑडीट वर्ग मिळालेला आहे. या वर्षी वेटेज ॲव्हरेज १00 पैकी ८९% गुण मिळवून संस्थेने चांदवड तालुक्यात प्रतिष्ठेचे व नंबर एकचे स्थान मिळविले आहे. ही आपणा सर्वांच्या दृष्टीने आभिमानाची गोष्ट आहे.

**आभार :-**

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीत सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मा. सहाय्यक निंबधक सो. सौ. शेळके मॅडम ,सहकार व बॅकिंग क्षेत्रातील सर्व अधिकारी,तसेच श्री. शिवाजीराव सोनवणे (कायदेशिर सल्लागार), संस्थेचे वाहन व्हॅल्युअर श्री. अभयकुमार मेहता (मालेगांव), सहकार,राजकीय , शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपला बहुमुल्य वेळ देवून संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन केले,भेटी देवून सुचना केल्या त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

॥ जय हिंद...! ॥

आपला स्नेहांकित,

(मा.प्रा.निकम टी.पी.)

चेअरमन

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड
## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०१८ अखेर

| भांडवल व देणी | | मालमत्ता व येणी | |
|---|---|---|---|
| **भागभांडवल** | **२२२४५५०.००** | रोख शिल्लक | ६८२१.०० |
| वसुल भागभांडवल | २२२४५५०.०० | **बॅंक** | **५९८९०३४.३४** |
| **ठेवी** | **६४१३१४३४.९२** | एन डी सी सी बॅंक चालु खाते | ४००६१८.०० |
| मुदत ठेव खाते | ३१८६५२७५.०० | एन डी सी सी बॅंक सेव्हींग खाते | १२८४२.०० |
| अल्पवचत ठेव खाते | ३८६९०.०० | नामको बॅंक चालु खाते शाखा चांदवड | ८७०७१०.७५ |
| बचत ठेव खाते | ११०६१८५४.९२ | स्टेट बॅंक शाखा चांदवड चालु खाते | ६०८९१७.१७ |
| दामदुप्पट ठेव | ६६२८०.०० | दि चांदवड मर्चन्टन्स बॅंक चालु खाते | १५५४६६५.११ |
| जेष्ठ नागरीक ठेव योजना | २१०९९३३५.०० | कार्पोरेशन बॅंक बचत खाते चांदवड शाख | ८३५०८४.०० |
| **निधी** | **९४६१७००.३७** | कार्पोरेशन बॅंक चालु खाते चांदवड शाख | १२०६१९७.३१ |
| राखीव निधी | २४०७९८०.९५ | आय डि बी आय बॅंक चालू खाते शा.ल | ५००००० .०० |
| इमारत निधी | ३३९१२६४.५० | **गुंतवणुक** | **३६६७९४५६.००** |
| सभासद लाभांश समिकरन | १८९०.०० | नामको बॅंक मुदत ठेव चांदवड शाखा | १५०१३५६१.०० |
| सभासद कल्याण निधी | १६३५६६.०० | लॉकर डिपॉझिट | ३००००.०० |
| विमा निधी | ९९६२९२.५० | रिझर्व्ह फंड एन डी सी सी बॅंक | १५१९४९१.०० |
| संशयीत व बुडित कर्ज निधी | १३४५२१८.१० | इमारत फंड खाते एनडीसीसी बॅंक चांदव | ७५१८.०० |
| वोर्ड व स्टाप ट्रेनिंग फंड | ५९३१०.०० | नाशिक जि पत फेडरेशन शेअर्स | १०००.०० |
| फर्निचर निधी | ५६९१२५.०० | महा.राज्य पतसंस्था फेडरेशन शेअर्स | ३०००.०० |
| संगणक निधी | १५४२२५.०० | नाशिक जि मध्य.सह बॅंक लि नाशिक शे | ५०००.०० |
| इलेक्ट्रीकल निधी | १११८९५.०० | पोस्ट ऑफिस पी पी एफ खाते चांदवड | १२६३५४.०० |
| धर्मदाय निधी | ७४८२९.०० | दि चांदवड मर्चन्टस को ऑप बॅंक मुदत | १४८२३५३२.०० |
| सुरक्षा यंत्रणा निधी | १८६१०४.३२ | एन डीसीसी बॅंक मुदत ठेव | ६५००००.०० |
| **देणी व तरतुद** | **७११५१९३.०५** | कॉसमॉस बॅंक मुदत ठेव | २००००००.०० |
| ऑडिट फी देणे | २३४३९.०० | आय डि बी आय मुदत ठेव खाते शा.ल | २५०००००.०० |
| शिक्षण निधी देणे | १००००.०० | **कर्ज** | **४०२३३०९५.२०** |
| मुदत ठेवीवरिल व्याज देणे | २३४६५८४.०० | सामान्य कर्ज | ३६७४६८५.०० |
| एन पी ए तरतुद | ११५०६०५.६५ | वाहन तारण कर्ज | ४२०३३५२.०० |
| सेवक सानुग्रह अनुदान | १६८६००.०० | व्यवसायीक मॉरगेज कर्ज | ८६९०११८.२० |
| अनामत खाते | ४२०००.०० | नजर गहान कॅश केडिट कर्ज | २००३६३१.०० |
| पी पी एफ देणे खाते | १२६३५४.०० | सोने चांदी तारण कर्ज | १०३४४८६०.०० |
| तांत्रिक विकास निधी | १३३३००.०० | मुदत ठेव तारण कर्ज | २५३२०००.०० |
| सभासद भेट वस्तु वितरण तरतुद१ | ६९६४२५.०० | गृहवांधणी कर्ज | ५९१२१८७.०० |
| कर्मचारी भविष्य निर्वाह निधी देणे | ३२२७२५.०० | टर्म लोन | २८७२२६२.०० |
| आकस्मित खर्च तरतुद | ७५०००.०० | **इतर येणे** | **८४०७९८.००** |

# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.चांदवड
## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०१८ अखेर

| भांडवल व देणी | | मालमत्ता व येणी | |
|---|---|---|---|
| सेवक कल्याण निधी | १४५९००.०० | टेलिफोन अनामत खाते | २०००.०० |
| सशस्त्र सेना ध्वज निधी | ५२००.०० | गुंतवणुकिवरील येणे व्याज | ८३८७९८.०० |
| महात्मा फुले संजीवनी योजना | ९६९६८०.०० | **कायम मालमत्ता** | **३५६८३२.००** |
| उत्तम जिंदगी तरतुद | ७०००००.०० | कायम मालमत्ता खाते | ३५६८३२.०० |
| पी.पी.एफ.व्याज तरतुद | ५००००.०० | **डेडस्टॉक** | **१९९६५४.००** |
| फर्निचर खरेदी तरतुद | १४९३८०.४० | डेडस्टॉक खाते | १९९६५४.०० |
| एकुण नफा | १३७२८१२.२० | | |
| | ८४३०५६९०.५४ | | ८४३०५६९०.५४ |

# महात्मा फुले नागरी सह . पतसंस्था मर्या . चांदवड
## नफा तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२०१८ अखेर

| खर्च | | उत्पन्न | |
|---|---|---|---|
| **इतर खर्च** | **१५९४९१०.८०** | **व्याज उत्पन्न खाते** | **६०७५३१०.००** |
| चांदवड नगरपरिषद कर | ४३१०.०० | वाहन तारण कर्जावरील व्याज जमाह्यउत्प | ८९६४७८.०० |
| प्रिंटिंग व स्टेशनरी | ४२८०८.०० | मॉरगेज व्यवसायीक व्याज जमा उत्पन्न | १२६७४४३.०० |
| किरकोळ खर्च | २६२१२.४० | नजरगहाण कॅश केडीट व्याज जमा उत्पन | ३०८५०५.०० |
| लाईट विल खर्च | ४००६०.०० | सोने चांदी कर्जावरील व्याज जमा उत्पन्न | १३४९७८५.०० |
| व्यवसाय कर खर्च | ७५०.०० | मुदत ठेव तारण व्याज जमाह्यउत्पन्नह | १८६५२७.०० |
| लॉकर भाडे | ५५००.०० | गृहबांधणी कर्जावरील व्याज जमाह्यउत्पन | ९९६७४४.०० |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | २२५००.०० | टर्म लोनवरिल व्याज | ४२३५३४.०० |
| जाहिरात खर्च खाते | १३३००.०० | सामान्य कर्जावरिल व्याज | ६४६२९४.०० |
| निवडणुक खर्च | १२१०१.०० | **गुंतवणुकिवरील व्याज** | **१७८२७७९.००** |
| फर्निचर व दुरूस्ती खर्च खाते | १४९३८०.४० | गुंतवणुकिवरील व्याज खाते | १७८२७७९.०० |
| घसारा खर्च | ५७२७५१.०० | | |
| मानधन खाते | १५२०००.०० | | |
| दुरूस्ती व देखभाल खर्च खाते | १६९०६.०० | | |
| वकिल फी खर्च खाते | १५३००.०० | | |
| भविष्य निर्वाह निधी | ३००००.०० | | |
| आरटिओ ट्रेड सर्टिफिकेट खर्च खाते | १४००.०० | | |
| वॉचमन खर्च खाते | १२००.०० | | |
| चहापान खर्च | १०२०६.०० | | |
| प्रवास खर्च | २६७०.०० | | |
| पी.पी.एफ.व्याज तरतुद खर्च | ५००००.०० | | |
| विमा खर्च | ४०००००.०० | | |
| पोस्टेज व टेलिफोन खर्च | २५५५६.०० | | |
| **व्याज खर्च खाते** | **३९४६३६६.००** | | |
| जेष्ठ नागरिक ठेवीवरिल व्याज | २११३३८६.०० | | |
| मुदत ठेवीवरील व्याज खर्च | १६३७५८६.०० | | |
| वचत ठेवीवरील व्याज खर्च | १९५३९४.०० | | |
| **पगार खाते** | **४४४०००.००** | | |
| पगार खाते | ४४४०००.०० | | |
| **एन पी ए खर्च** | **५०००००.००** | | |
| एन पी ए खर्च खाते | ५०००००.०० | | |

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

## नफा तोटा पत्रक दिनांक ३१/0३/२0१८ अखेर

| खर्च | | उत्पन्न | |
|---|---|---|---|
| ताळेबंद कडे एकुण नफा | १३७२८१२.२0 | | |
| | ७८५८0८९.00 | | ७८५८0८९.00 |